REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 4 | JANUARY - 2024

# मराठी साहित्य आणि समाज माध्यम

**विजया बबन बनसोडे**
**एम. ए (मराठी). सेट नेट**



कोणत्याही समाजाचा अभ्यास करताना, त्या समाजाची जीवनशौली, सामाजिक प्रकृती समजून घेवून त्या समाजात कार्यरत असलेली राजकीय व्यवस्था, त्याचे राजकीय संदर्भ, त्या समाजाच्या परिस्थितीशी तिचा असलेला संबंध लक्षात घ्यावा लागतो. मराठी कादंबरीमध्ये कालांतराने जे अनेक प्रवाह उदयास आले, त्यांत प्रामुख्याने वसाहतकालीन कादंबरी, वसाहतोत्तर कादंबरी किंवा स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कादंबरी, प्रादेशिक, ऐतिहासिक, सामाजिक, मानसशास्त्रीय, वास्तववादी , ग्रामीण, दलित, आदिवासी कादंबरी इत्यादी प्रवाह आहेत. हे प्रवाह, प्रकृतीनुसार मराठी कादंबरीला समजून घ्यावे लागतात. मराठी कादंबरीतून जीवनवादी, कलावादी, सौंदर्यवादी, रंजनवादी, विज्ञानवादी हे दृष्टीकोन समोर येतात. माक्र्सवादी , आंबेडकरवादी, गांधीवादी, स्त्रीवादी यांसोबतच रूपवादी, तंत्रात्मक शौलीवादी , प्रायोगिक , संरचनावादी, अस्तित्ववादी असे तिच्यातील विशिष्टत्वानुसार असलेल्या अनेक रूपांचा विचार आवश्यक असतो. त्यानुसार तिचे आकलन करून घ्यावे लागते. त्यातूनच मराठी कादंबरीच्या विकासाचे, प्रेरणांचे , प्रयोजनाचे चित्र स्पष्ट होते. कादंबऱ्याच्या स्वरुपात अनेक प्रकारचे दृष्टिकोन, तत्वज्ञान, भूमिका कार्यरत असतात. लेखकांच्या वेगवेगळ्या प्रवृत्ती व प्रकृती विविध स्वरूपाच्या कादंबऱ्यातून दिसून येतात.

कोणत्याही समाजामध्ये सामाजिक गरज भागविण्यासाठी समाजातील संस्थांप्रमाणेच राजकारण, राजसत्ता, राजकीय प्रणाली , राजकीय पद्धती सक्रियपणे कार्य करीत असतात. त्यात सातत्य असते, त्यामुळे राजकीय पद्धती-प्रणालीनुसार त्या त्या समाजाचा एक राजकीय दृष्टिकोन , एक राजकीय स्वभाव, एक राजकीय जाणीव तयार होते. मराठी समाजाचा विचार करताना जगातल्या प्रत्येक समाजाप्रमाणे त्याला वैशिष्ट्यपूर्ण राजकीय इतिहास आहे. सत्तेशी मराठी समाजाचे वेगवेगळ्या पातळयांवर संबंध राहिले असल्याचे दिसून येते.

स्वातंत्र्यपूर्व मराठी कादंबरीचा विचार करताना असे दिसून येते की, कादंबरीच्या प्रेरणा पुराणदर्शवादी, अलौकिकतावादी, आध्यात्मिक प्रेरणा मानणाऱ्या होत्या. रंजन व आनंद हे प्रयोजन होते. सौंदर्य व तंत्रनिष्ठेने समाजवास्तवापासून मराठी कादंबरी दूर राहिली. म्हणून राजकीय कादंबरी या कृतिनिष्ठ कादंबरीप्रवाहाची सशक्त परंपरा मराठीत निर्माण झाल्याचे दिसत नाही. कारण राजकीय कादंबरी सामाजिकच असते. राजकीयत्व हे समाजाच्या सर्वस्वाला भारूनच वावरत असते. ते कादंबरीत स्वभावत:च यायला हवे. मात्र मराठी साहित्यांच्या अलौकिक भूमिकेने कादंबरीला वास्तवापासून अलग ठेवल्याने राजकीय कादंबरीचा विकास स्वतंत्रपणे झालेला दिसत नाही. अनेक कादंबज्यांत तो अनुषंगानेच आल्याचे दिसून येते.

समाजाचा दृष्टिकोन घडविण्यात राजकीयत्व प्रभावी ठरते. तर संस्कृतीलाही आपल्या उद्देशासाठी राबवण्याचे कार्य राजकारण करीत असते. म्हणून साहित्याचा सामाजिक व राजकीय संबंध तपासताना सांस्कृतिक संबंधही थोडक्यात समजून घ्यावा लागतो. याविषयी गो. म. कुलकर्णी म्हणतात, साहीत्याचा आणि संस्कृतीचा फार निकटचा संबंध आहे. किंबहुना साहित्य हा या संस्कृतीचाच एक भाग. संस्कृती म्हणजे विशिष्ट काळातील विशिष्ट समाजाची किंवा समाजगटाची जगण्याची विशिष्ट रीती, पद्धती, धाटणी. या धाटणीत धर्मकल्पना, आचार-विचार, रूढी, तत्वप्रणाली, संकेत, शिष्टाचार, परंपरा, प्रतिमा -प्रतिके, भाषा, कला, साहित्य, इतिहास, विज्ञान, श्रद्धा, प्रक्कथा , श्रेय-प्रेय कल्पना, विधिनिषेध या साऱ्याचाच साकल्याने अंतर्भाव होतो. या साऱ्या घटकांचे एक रसायन सिद्ध होऊन ते त्या त्या समाजाला संकुलपणे व्यापून राहते. सर्वांना एकत्र आणते. समाजातील सर्व घटकांना समान असे भावसाहित्य निर्माण करते. त्या त्या काळातील जीवन व्यवहाराला त्या काळाच्या दृष्टीने सुसंघटीत होत आली. सौंदर्यपूर्ण सत्यपूर्ण अर्थ प्रदान करते. याचा अर्थ साहित्यातून संस्कृतीचेही दर्शन घडत असते. तसेच तत्कालीन समाजाचे , राजकारणाचे चित्रण असते.

प्रत्येक काळानुसार साहित्यात बदल होत असतो. त्यात राजकारण हा अतिशय महत्त्वाचा भाग आहे. कारण राज्यकारभार करणारी मंडळी समाजात जशी नवीन ध्येयधोरणे स्वीकारतात, तसे समाजात नव-नवीन प्रवाह येतात, समाज बदलतो आणि समाज बदलला, की साहित्यही बदलते, त्यांच्यामुळेच साहित्य आणि समाज यांचा जवळचा संबंध आहे असे म्हणतात. यासंदर्भात रंगनाथ पठारे लिहितात, "साहित्य ही एक सामाजिक वस्तू आहे. लिहिणारा समाजात जन्म घेतो, वाढतो. त्याच्या जगण्यात त्याच्या काळातल्या समाजाविषयी, त्यातल्या माणसाविषयी, त्यांच्यातल्या नात्यांविषयी वेगवेगळ्या प्रकारे त्याला जे प्रश्न पडतात त्यांच्या अनुषंगाने एक प्रतिक्रिया म्हणून ते समजावून घेण्याचा एक भरीव प्रयत्न म्हणून तो लिहित असतो. असे हे लिखाण व रचना करणे तो एकटा करीत असला तरी तो सुटा-एकटा असा नसतो आणि हे लिहून झाले, की जे काही तयार होते ते साऱ्या समाजाचे असते. त्याला सामाजिक मूल्य मिळते. लिहिणे हा समाजाविषयी, मानवी नात्यांविषयी काही सत्य शोधण्याचा, त्यांच्याकडे जाण्याचा मार्ग असतो. साहजिकच हा रस्ता या ना त्या प्रकारे समाजातूनच जातो. त्यांच्याबाहेर त्याला काही महत्त्वाचा अर्थ असतच नाही". म्हणून साहित्याचा व तत्कालीन समाजाचा अभ्यास करताना साहित्याचा उपयोग होऊ शकतो. सामाजिक मूल्यांचा हा विचार महत्त्वाचा ठरतो.

सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन, शैक्षणिक, कलात्मक देवाणघेवाणीतून भाषा समृद्ध होत असते. असं समाजमाध्यमांवर मराठी भाषेच्या संदर्भात घडताना दिसतंय का? तर ही माध्यमे मराठी भाषेच्या विकासासाठी पूरकच ठरली आहेत. इथं व्यक्त होताना भाषेचा आणि भाषेच्या विविध प्रारूपांचा अडसर येत नाही, ही या माध्यमांची आणखी एक जमेची बाजू. मराठी भाषेच्या दृष्टीनं सकारात्मक बाब हीच, की सोशल मीडियावर मराठी भाषेचा वापर वाढलेला आहे. आरंभी या माध्यमांवर इंग्रजी भाषेचाच वापर केला जाई, कालांतरानं देवनागरी लिपीचा वापर होऊ लागला. नव्या पिढीलाही आपल्या मातृभाषेत संवाद साधायला, अभिव्यक्त व्हायला आवडत आहे. खरं तर आपल्या भाषेत संवाद साधणं, व्यक्त होणं सहज सोपं आणि तितकंच प्रभावी असतं, हा आजच्या पिढीचा अनुभव आहे. यामुळं जगभरात मराठी भाषा पोचायला मदत होणार आहे हे नक्की आहे. भाषा कुठलीही असो, प्रत्यक्ष जगण्यातली, माध्यमातली वा समाजमाध्यमातली, तिची बुज तिच्या आशयाच्या गाभ्यात सामावलेली असते. आशयाच्या अभिव्यक्तीवरच भाषेचं स्वरूप अवलंबून असतं, म्हणून समाजमाध्यमांवरील भाषेचा विचार करताना माध्यमांवरील अभिव्यक्तीचा विचार. समाजमाध्यमांचे पर्यावरणही महत्त्वाचे आहे. त्याशिवाय माध्यमांवरील भाषेचे स्वरूप नेमकेपणाने सांगणे अवघड आहे. जगण्याच्या पर्यावरणाबरोबरच समाजमाध्यमांवर तुम्ही काय वाचता, बघता, ऐकता यातून तुमच्या विचारांची भाषा तयार होत असते. माध्यमांवरची मराठी भाषा माध्यमं बोलत नसून आपणच बोलत असतो, ती आपली व आपल्या समाजाच्या सृजनाची भाषा असते.

समाजमाध्यमांवरची मराठी भाषा ही स्वैर स्वरूपाची, लेखन नियमांचे संकेत टाळून, भाषिक चौकट मोडून साकारतेय. शुद्ध-अशुद्ध प्रमाण बोली, ग्रामीण नागरी लोकभाषा जनभाषा याच्या सर्व सीमारेषा धूसर झालेल्या दिसतात. ही भाषा बहुरंगी, बहुढंगी, बहुपदरी आहे. कारण वृत्ती-प्रवृत्ती, भाव-स्वभाव, वय, लिंग, प्रदेश परिस्थिती, जनसमुदाय आदीनुसार तिचा पोत आणि पदर, आशय आणि अभिव्यक्ती अनुभवायला मिळते. या भाषेला वेगवेगळे आयाम आहेत. नाना भाषिक आविष्कार मराठी भाषेत होतील याची शक्यता नाकारता येत नाही. सोशल मीडियानं प्रत्येकाला आवाज तर दिलाय, पण भाषा घडविण्यात-बिघडविण्यातही त्यांचा वाटा आहे. यावर वापराचे कसलेच निर्बंध नसल्यानं भाषेची शिस्त, सौंदर्य, श्रीमंती हरवून जात आहे, याकडंही लक्षवेध करावा वाटतो. इथली मराठी भाषा ही बऱ्याच अंश uमारहिलीशश अशी बहुभाषिक मिश्रण असलेली आढळते. आधुनिकीकरण, नागरिकीकरणामुळं आपला समाज बहुभाषिक पर्यावरणातला समाज बनत चालला आहे. त्याचं प्रतिबिंबही समाजमाध्यमांवरील मराठी भाषेत दिसून येत आहे. या माध्यमांमुळं वेगवेगळ्या भाषा, बोली, एकमेकींच्या जवळ येण्यातून भाषेला नवं रूप प्राप्त होत असते, यातूनही काही तरी भाषिक नवोत्सर्जन व्हायला मदत होईल.

## संदर्भ

1.नळदोत्तर मराठी साहित्य (अजय कुलकर्णी)

2.मराठी साहित्य-प्रवाह प्रकार आणि प्रतिबिंब संपादक -डॉ.सतिश कामत (शब्दालय प्रकाशन)

3.मराठी साहित्य समाज आणि संस्कृती आनंद यादव -मेहता पब्लिशिंग हाऊस